| | |
|---|---|
| MHSN090011452025 | दाखल दिनांक – २२.०९.२०२५<br>नोंदणी दिनांक – २२.०९.२०२५<br>निकाल दिनांक –२५.०३.२०२६<br>कालावधी –० वर्षे ६ महिने ३ दिवस |

**भाग – अ**

| | |
|---|---|
| | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव यांच्या न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारीः–सतिष वाय. वाकचौरे)<br>(घोषित दिनांक २५.०३.२०२६)<br>**नियमीत फौजदारी खटला क्र.२२३/२०२५ नि.क्र. ५१**<br>गु.र.क्र. – १३७/२०२५ पोलीस स्टेशन तासगांव<br>भारतीय दंड विधान कायदा कलम ११८(१), १८९(२), १९१(२), ११५(२), ३२४(४), ३५२ सह कलम १९० अन्वये |
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता | श्रीमती एस.व्ही. पाटील. |
| आरोपी | १. गुलाब निवृत्ती सुर्यवंशी<br>वय : ५३ वर्षे, धंदा : शेती,<br>२ अभिजीत गुलाब सुर्यवंशी<br>वय : २३ वर्षे, धंदा : शेती,<br>३. निवृत्ती भिमराव सुर्यवंशी<br>वय : ८३ वर्षे, धंदा : शेती,<br>४. इंद्रजित दिनकर सुर्यवंशी<br>वय : २६ वर्षे, धंदा : शेती,<br>५. रणजित दिनकर सुर्यवंशी<br>वय : ३५ वर्षे, धंदा : शेती,<br>६. संध्याराणी गुलाब सुर्यवंशी<br>वय : २५ वर्षे, धंदा : शिक्षण,<br>७.सुनिता गुलाब सुर्यवंशी |

| | |
|---|---|
| | वय : ४७ वर्षे, धंदा : घरकाम,<br>८. पद्मीनी उर्फ धोंडूबाई निवृत्ती सुर्यवंशी<br>वय : ७८ वर्षे, धंदा : घरकाम,<br>सर्व रा. डोंगरसोनी, ता. तासगांव. जि. सांगली. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. बी.एन.शाळगांवकर |
| **भाग – ब** | |
| गुन्हयाची तारीख | १७.०३.२०२५ |
| गुन्हा दाखल तारीख | १७.०३.२०२५ |
| पहिली खबर दिनांक | १७.०३.२०२५ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | २२.०९.२०२५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०८.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०७.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयांचा दिनांक | २५.०३.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त |

## आरोपींचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी. |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | सी. |
| १ | गुलाब निवृत्ती सुर्यवंशी | भा.न्या. संहिता कलम ३५(३) प्रमाणे नोटीस | -- | भा.न्या.सं. २०२३ चे कलम ११८(१), १८९(२), १९१(२), ११५(२), ३२४(४), ३५२ सह कलम १९० अन्वये | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| २ | अभिजीत गुलाब सुर्यवंशी | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- |
| ३ | निवृत्ती भिमराव सुर्यवंशी | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- |
| ४ | इंद्रजित दिनकर सुर्यवंशी | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- |
| ५ | रणजित दिनकर सुर्यवंशी | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- |
| ६ | संध्याराणी गुलाब सुर्यवंशी | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- |
| ७ | सुनिता गुलाब सुर्यवंशी | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | पद्मीनी उर्फ धोंडूबाई निवृत्ती सुर्यवंशी | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- | -॥- |

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| १ | सविता अशोक सुर्यवंशी | ४१ | फिर्यादी |
| २ | अशोक विलास सुर्यवंशी | ४३ | साक्षीदार |

### ब. बचाव साक्षीदार व इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार ) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क. कोर्ट साक्षीदार व इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार पंच साक्षीदार ) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी

### अ. अभियोग

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | ४२ | फिर्यादीची फिर्यादवरील सही (साक्षीदार क्र. १) |
| २ | ४५ | घटनास्थळ पंचनामा (बचावपक्षास मान्य) |
| ३ | ४६ | जप्ती पंचनामा (बचावपक्षास मान्य) |

| | | |
|---|---|---|
| ४ | ४७ | फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र (बचावपक्षास मान्य) |
| ५ | ४८ | साक्षीदाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र (बचावपक्षास मान्य) |
| ६ | ४९ | साक्षीदाराचे वैद्यकीय प्रमाणपत्र (बचावपक्षास मान्य) |

**ब. बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रमाक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | एम आर. क्र. ४८/२२५ | १. एक ३१ इंच लांबीचा २.५ पे-याचा कळकाचा दांडा असलेली जुनी वापरती कु-हाड<br>२. एक ३२ इंच लांबीची २.५ पे-याची जुनी वापरती कळकाची काठी<br>३. एक ३४ इंच लांबीची ३.५ पे-याची जुनी वापरती कळकाची काठी<br>४. एक लाल निळया रंगाच्या पटयाची जुनी वापरती चप्पल |

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांकः- २५.०३.२०२६)

प्रस्तुत खटला आरोपींचे विरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ११८(१), १८९(२), १९१(२), ११५(२), ३२४(४), ३५२ सह कलम १९० अन्वये चालविण्यात आला.

**प्रस्तुत खटल्याची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः**

२) दिनांक १७.०३.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास मौजे डोंगरसोनी, ता. तासगांव, जि. सांगली येथे फिर्यादीच्या घरामध्ये असताना तिला बाहेरुन मोठ–मोठयाने शिवीगाळ करण्याचा आवाज आल्याने तिने बाहेर येवून पाहिले असता तिचा मोठा मुलगा राहूल हा पाठीमागील गोठयामध्ये शेळी बांधत होता व चुलत सासरे निवृत्ती सुर्यवंशी हे त्याला शिवीगाळ करत होते. तेव्हा फिर्यादीने मुलगा राहूल यास काय झाले असे विचारले असता त्याने शेळीच्या गळयातील रस्सी तुटल्याने तिने शेजारील आजोबांचे फुलांचे झाड खाल्ले म्हणून आजोबा मला शिवीगाळ करत आहेत असे सांगितले. त्यावेळी फिर्यादी तिच्या मुलाला घेवून घरामध्ये गेली परंतु आरोपी क्र. १ व २ हे दोघे हातामध्ये कु–हाड व काठी घेऊन पाठीमागून आले व फिर्यादीला धरुन घराबाहेर ओढत आणून, "तुला चार वेळा मारले, तरी तु काय केलेस "असे म्हणून आरोपी क्र. १ याने फिर्यादीला कु–हाडीच्या दांडयाने मांडीवर व आरोपी क्र. २ याने तिच्या डोक्यात काठीने मारले. तसेच आरोपी क्र. ३ याने फिर्यादीच्या डोक्यात व तोंडावर चप्पल मारले. तसेच आरोपी क्र. ४ व ५ यांनी मुलगा राहूल यास लाथाबुक्यानी मारहाण करुन गळा पकडून काठीने डाव्या हातावर, पायावर व पाठीत मारले. त्यावेळी त्यांना सोडविण्याकरिता फिर्यादीचे पती अशोक सुर्यवंशी हे मध्ये आल्यास आरोपी क्र. ४ याने त्यांच्या डोक्यात व पाठीवर काठीने मारहाण केली. त्यावेळी मुलगा राहूल हा मोबाईलमध्ये व्हीडीओ काढत असताना आरोपी क्र. ४ याने त्याच्या हातातील मोबाईल घेऊन तो खाली आपटून त्याचे नुकसान केले. त्यावेळी आरोपी क्र. ६ याने शिवीगाळ करुन फिर्यादीशी झटापटी केली. त्यादरम्यान फिर्यादीच्या

गळयातील मंगळसुत्र कोठेतरी पडून गहाळ झाले. भांडणाचा आवाज ऐकून फिर्यादीचे चुलत दीर संभाजी सुर्यवंशी हे तिथे आले व त्यांनी भांडण सोडविले. त्यानंतर सर्व आरोपी तेथून निघून गेले. म्हणून फिर्यादीने सदर घटनेची फिर्याद तासगांव पोलिस ठाण्यात दिली.

३) सदरच्या फिर्याद वरुन आरोपींचे विरुध्द गु.र.क्र. १३७/२०२५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. पुढे तपास अधिकारी यांनी साक्षीदारांचे जाबजबाब घेवून जखमीची वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन प्रस्तुत गुन्हयाचा तपास पुर्ण केला व आरोपीचे विरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४) आरोपीचे विरुध्द भा.न्या.सं. २०२३ कलम ११८(१), १८९(२), १९१(२), ११५(२), ३२४(४), ३५२ सह कलम १९० अन्वये अन्वये दोषारोप निशाणी क्र.२८ वर निश्चित करुन त्यातील मजकूर आरोपी क्र. १ ते ८ यांना त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला असता, आरोपींनी अनुक्रमे निशाणी क्र. २९ ते ३६ नुसार गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५) प्रस्तुतचा गुन्हा सिध्द करणेसाठी अभियोग पक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदाराच्या पुराव्यातून आरोपींविरुध्द आक्षेपाहार्य विधान न आल्यामुळे आरोपी क्र. १ ते ८ यांचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ अन्वये निवेदन माफ करण्यात आले.

६) अभिलेखावरील पुरावा व दोन्ही पक्षाचे कथन लक्षात घेवून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात व त्यावर मी माझ्या कारणमिमांसेसह निष्कर्ष

देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १७.०३.२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजेच्या सुमारास मौजे डोंगरसोनी, ता. तासगांव, जि. सांगली येथील फिर्यादीच्या घरासमोर आरोपी क्र. १ ते ८यांनी आपसात संगनमत करुन त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्याकरिता त्यांच्यापैकी आरोपी क्र. १ याने कु-हाडीच्या दांडयाने फिर्यादीच्या मांडीवर , आरोपी क्र. २ याने काठीने फिर्यादीच्या डोक्यात व आरोपी क्र. ३ याने चप्पलने फिर्यादीच्या तोंडावर व डोक्यात मारले तसेच आरोपी क्र. ४ व ५ यांनी साक्षीदार राहूल याच्या हातावर, पायावर व पाठीत काठीने मारुन फिर्यादी व साक्षीदाराला इच्छापूर्वक दुखापत पोहचविली आणि याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| २. | उपरोक्त नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ८ यांनी संगनमताने त्यांचे सामाईक उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमविला व त्या जमावाचे सदस्य झाले आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिताचे कलम १८९(२) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ३. | उपरोक्त नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ८ यांनी संगनमताने त्यांचे सामाईक उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमविला व दंगा केला आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिताचे कलम | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | १९१(२) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | |
| ४. | उपरोक्त नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ८ यांनी संगनमताने त्यांचे सामाईक उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमऊन त्यापैकी आरोपी क्र. ४ व ५ यांनी फिर्यादीचा मुलगा राहूल यास लाथाबुक्यानी मारहाण केली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिताचे  कलम ११५(२) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ५. | उपरोक्त नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ८ यांनी संगनमताने त्यांचे सामाईक उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमऊन त्यापैकी आरोपी क्र. ४ यांनी फिर्यादीचा मुलगा राहूल याच्या हातातील मोबाईल खाली आपटून त्याचे नुकसान केले व आरोपी क्र. ६ते ८ यांनी फिर्यादीशी झटापट केल्याने तिच्या गळयातील मंगळसुत्र गहाळ झाले आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिताचे  कलम ३२४(४) सह कलम १९० अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ६. | उपरोक्त नमुद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. १ ते ८ यांनी संगनमताने त्यांचे सामाईक उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमऊन त्यापैकी आरोपी क्र. ३ यांनी फिर्यादीचा मुलगा राहूल यास  व आरोपी क्र. ६ते ८ यांनी फिर्यादीस शिवीगाळ करत त्यांचा अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले व त्यांच्या हातून सार्वजनिक शांतता भंग व्हावी किंवा अन्य अपराध | नाही |

| | | |
|---|---|---|
| | घडावा या उद्देशाने त्यांचा अपमान केला आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय न्याय संहिताचे कलम ३५२ सह कलम १९० अन्वये गुन्हा केला हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | |
| ७. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

७) आरोपींविरूध्द गुन्ह्याचे घटक सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाद्वारे वर नमूद साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. या व्यतिरीक्त इतर कोणताही साक्षीदार अभियोग पक्षाने तपासलेला नाही. बचाव पक्षाने घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. ४५), जप्ती पंचनामा (निशाणी क्र. ४६)व जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र अनुक्रमे निशाणी क्र. ४७ ते ४९ हे मान्य केले आहे. पुढे निशाणी क्र. ३८ अन्वये मुळ फिर्यादी यांनी वकीलपत्र दाखल करुन निशाणी क्र. ३९ अन्वये केलेल्या अर्जावर प्रस्तुत प्रकरणामध्ये तडजोड करण्याची परवानगी मागितली. परंतु प्रस्तुत प्रकरणातील गुन्हे तडजोडपात्र नसल्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आला. पुढील मुळ फिर्यादी यांनी निशाणी क्र. ५० अन्वये पुरशिस दाखल करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला आहे. तसेच सदर तोंडी पुराव्याव्यतीरिक्त इतर कोणताही कागदोपत्री पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर दिलेला नाही.

८) अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्रीमती एस.व्ही.पाटील व आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. बी.एन.शाळगांवकर यांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्र.१ ते ६ करीता :**

९) मुद्दा क्र. १ ते ६ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांच्या कारणांची व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्दे मी एकत्रीत विचारात घेतले आहेत.

१०) सविता अशोक सुर्यवंशी साक्षीदार क्र. १ निशाणी क्र. ४१ या प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी असुन त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्या आरोपी यांना ओळखतात. ते त्यांच्या शेजारी राहतात. घटना केव्हा व किती तारखेला घडली होती हे त्यांना आठवत नाही. दिनांक १७.०३.२०२५ रोजी त्या गोठयात पडल्या होत्या. त्यादिवशी आरोपींचे त्यांचेशी कोणतेही वाद झालेले नाहीत.

११) अशोक विलास सुर्यवंशी साक्षीदार क्र. २ निशाणी क्र. ४३ व राहूल अशोक सुर्यवंशी साक्षीदार क्र. ३ निशाणी क्र. ४४ या दोन्ही साक्षीदारांनी पुराव्यादरम्यान ते आरोपींना ओळखतात व त्यांचे आरोपींसोबत कोणतेही वाद झालेले नाहीत असे कथन केले आहे.

१२) सदर तिनही साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने सहा. सरकारी वकीलांनी साक्षीदारांना फितुर घोषीत करुन उलट तपासात विचारता येईल असे प्रश्न विचरण्याची परवानगी मागितली, ती देण्यात आली. परंतू, उलटतपासादरम्यान अभियोग पक्षास मदत होईल असे कोणतेही विधान तिनही

साक्षीदारांनी पुराव्यादरम्यान केले नाही. उलट अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे घटना स्पष्टपणे नाकारली आहे.

१३) एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांनी घटनेची तारीख, वेळ व ठिकाण सांगितलेले नाही. तसेच उलटतपासादरम्यान घटना स्पष्टपणे नाकारली आहे फिर्यादी साक्षीदाराने दिनांक १७.०३.२०२५ रोजी ती गोठयात पडली होती असे कथन केलेले असल्याने निशाणी क्र. ४७ वर दाखल असलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रावर नमूद असलेल्या जखमा फिर्यादीला गोठयात पडल्यामुळे झाल्या असव्यात ही शक्यता नाकारता येत नाही. बचाव पक्षाने इतर दोन्ही साक्षीदारांचे वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केले असले तरी त्यांनी पुराव्यादरम्यान आरोपींनी त्यांना मारहाण केल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. अभियोग पक्षाच्या पुराव्यातून आरोपींनी अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे बेकायदेशीर जमाव जमवून, त्या जमावाचे सदस्य होवून दंगा केला व त्यादरम्याने फिर्यादी व साक्षीदारांना कु–हाडीच्या दांडयाने तसेच काठीने व लाथा बुक्यानी मारहाण करुन शिवीगाळ करुन अपमानीत केले. तसेच साक्षीदार राहूल याचा मोबाईल आपटून नुकसान केले व फिर्यादीचे मंगळसुत्र घटनेदरम्यान गहाळ झाले ही सर्व घटना सिध्द होत नाही. अभिलेखावर आलेला पुरावा गुन्हयाचे कोणतेही घटक सिध्द करण्यासाठी पुरेसा पुरावा होत नाहीत. बचाव पक्षाने घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा जरी मान्य केलेला असला तरी अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांनी घटना स्पष्टपणे नाकारलेली असल्याने व घटनेची तारीख, वेळ व ठिकाण सांगितलेले नसल्याने त्या दोन्ही पंचनाम्यांची अभियोग पक्षास गुन्हयाचे घटक सिध्द करण्याकरिता मदत होताना

दिसत नाही. वरील विवेचनावरुन अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे गुन्हयाचे कोणतेही घटक सिध्द केलेले नाहीत असे अनुमान निघते. यास्तव मी मुद्दा क्र. १ ते ७ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.८ करिता :**

१४) वरील सर्व बाबी विचारात घेऊन मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो आहे की, अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हयाचे कोणतेही घटक संशयापलीकडे जाऊन सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे आरोपी क्र. १ ते ८ हे प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. यास्तव मी आरोपींच्या निर्दोष मुक्ततेकरिता व जप्त मुद्देमालाची योग्य ती विल्हेवाट लावण्याकरिता मुद्दा क्र. ८ चे उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१) आरोपी १. गुलाब निवृत्ती सुर्यवंशी २ अभिजीत गुलाब सुर्यवंशी ३. निवृत्ती भिमराव सुर्यवंशी ४. इंद्रजित दिनकर सुर्यवंशी ५. रणजित दिनकर सुर्यवंशी ६. संध्याराणी गुलाब सुर्यवंशी ७.सुनिता गुलाब सुर्यवंशी ८. पद्मीनी उर्फ धोंडूबाई निवृत्ती सुर्यवंशी याची भारतीय न्यायसंहिता, २०२३ चे कलम ११८(१), १८९(२), १९१(२), ११५(२), ३२४(४), ३५२ सह कलम १९० अन्वये मधून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपी क्र. १ ते ८ यांनी जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३) जप्त मुद्देमाल १. एक ३१ इंच लांबीचा २.५ पे-याचा कळकाचा दांडा असलेली जुनी वापरती कु-हाड २. एक ३२ इंच लांबीची २.५ पे-याची जुनी वापरती कळकाची काठी ३. एक ३४ इंच लांबीची ३.५ पे-याची जुनी

वापरती कळकाची काठी व ४. एक लाल निळया रंगाच्या पटयाची जुनी वापरती चप्पल हे मूल्यहीन असल्याने ते सर्व अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावेत.

४) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ अन्वये आरोपी क्र. १ ते ८ यांनी रक्कम रु.२०,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र देण्याची पुर्तता करावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.03.25 17:56:45 +0530

( एस.वाय. वाकचौरे )

दिनांक : २५.०३.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव.